North Asian International Research Journal of Multidisciplinary

CIF IMPACT FACTOR:4.465

ISSN: 2454-2326 Vol. 4, Issue-11 November-2018

Index Copernicus Value 58.12

# कुष्ठरोगी व्यक्तीच्या सामाजिक, आर्थिक आणि आरोग्य विषयक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावरील प्रभावाचे समाजशास्त्रीय अध्ययन– अमरावती जिल्हयांच्या संदर्भात

**संशोधक : बंडू उत्तमराव जामनिक,[1] पीएच्. डी. संशोधक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.**
**मार्गदर्शक : डॉ. देविदास श्रीराम भगत,[2] समाजशास्त्र विभाग प्रमुख, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, मंगरुळपीर, जि. वाशिम.**

कुष्ठरोगी व्यक्तीच्या समाजिक आर्थिक आणि आरोग्य विषयक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावरील प्रभावाचा अभ्यास या संशोधनामध्ये करण्यात आला आहे. प्रस्तुत अभ्यास हा अमरावती जिल्हयातील कुष्ठरोगी व्यक्तीच्या संदर्भात करण्यात आला आहे. या संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. संशोधनासाठी अमरावती जिल्हयातील कुष्ठरोगी व्यक्तीची निवड करण्यासाठी संभाव्य नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात आला व त्यामाध्यमातुन एकूण 300 कुष्ठरोगीची निवड या संशोधनासाठी करण्यात आली. संशोधनासाठी तथ्य संकलन करण्यासाठी कुष्ठरोगी व्यक्तीच्या सामाजिक आर्थिक आणि आरोग्य विषयक समस्या आणि त्यांचे मानसिक आरोग्य यासंदर्भातील मुलाखत अनुसूचि विकसित करण्यात आली ही अनुसूचि प्रमाणित करुन तथ्य संकलनासाठी वापरण्यात आली आहे.. प्राप्त तथ्यांचे संकलन केल्यानंतर तथ्य विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारी पध्दती, काई स्क्वेअर, प्रसरण अनुपात मूल्य, मध्यमान आणि आलेख या सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात आला. तथ्य विश्लेषणाच्या माध्यमातुन या संशोधाच्या संदर्भात निष्कर्ष मांडण्यात आले आहे त्यामध्ये स्पष्ट करण्यात आले की, कुष्ठरोगी व्यक्तींच्या सामाजिक, आर्थिक आणि आरोग्य विषयक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर प्रभाव पडतो. यामध्ये ज्या कुष्ठरोगी व्यक्तींच्या सामाजिक, आर्थिक आणि आरोग्य विषयक समस्या उच्च प्रतिच्या आहेत त्यांचे मानसिक आरोग्य निम्न आहे तर ज्या कुष्ठरोगी व्यक्तींच्या सामाजिक, आर्थिक आणि आरोग्य विषयक समस्या निम्न आहेत त्यांचे मानसिक आरोग्य प्रभावी असल्याचे आढळून आले.अशा स्थितीत कुष्ठरोगी व्यक्तींच्या सामाजिक, आर्थिक आणि आरोगय विषयक समस्या सोडवण्यासाठी सामाजिक स्तरावर आणि शासकीय स्तरावर सक्रिय प्रयत्नाची गरज असल्याचे दिसून येते.

## 1.1 प्रस्तावना :

आजच्या आधुनिक युगामध्ये सुध्दा कुष्ठरोगी व्यक्तीच्या संदर्भात विविध समस्या असल्याचे आढळून येते त्यांना केवळ आरोग्य विषयक समस्यांनाच सामोरे जावे लागत नाही तर आरोग्य विषयक समस्येबरोबरच आर्थिक आणि सामाजिक समस्यांना देखिल सामोरे जावे लागते. कुष्ठरोग हा जीवणुमुळे होणारा एक आजार आहे हे वैद्यकीय संशोधनाच्या माध्यमातुन सिध्द झालेले असले आणि या आजाराविषयी सामाजिक धारणामध्ये सकारात्मक विचारप्रवाह विकसित करण्यासाठी शासकीय आणि सामाजिक संस्था मोठया प्रमाणात प्रयत्न करीत आहेत तरी सुध्दा कुष्ठरोगी व्यक्तीना समाजामध्ये जीवन जगत असतांना सामाजिक समस्यांना मोठया प्रमाणात समोर जावे लागते या सामाजिक समस्यांमधुन त्यांच्या बाबतीत आर्थिक समस्या सुध्दा निर्माण होतात

समाजामध्ये या व्यक्तींच्या संदर्भात असलेल्या गैरसमजामुळे लोक त्यांना कामावर ठेवत नाहीत शिवाय कधी कधी कुष्ठरोगी व्यक्तीच्या कुटुंबातील व्यक्तींना सुध्दा कामावर येण्यास मज्जाव करण्यात येतो परिणामता कुटुंब चालविण्यासाठी आणि कुटुंबाच्या दैनिक गरजा भागवण्यासाठी आवश्यक असलेले आर्थिक पाठबळ प्राप्त होत नाही अशा स्थितीत त्यांना समाजाच्या अलिप्त राहुनच किंवा मुळ निवास सोडून जावे लागते व त्या नविन ठिकाणी सुध्दा आमच्या कुटुंबामध्ये कुष्ठरोगी व्यक्ती नाही अशा प्रकारचा दिखावा करावा लागतो. अशा प्रकार कुष्ठरोगी व्यक्तींना आणि त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींना जीवन जगत असतांना विविध प्रकारच्या सामाजिक आणि आर्थिक समस्या येतात आणि या समस्यांमुळे त्यांच्या आरोग्य विषयक बाबीकडे अपेक्षीत प्रमाणात लक्ष दिल्या जात नाही परिणामता त्याचे आरोग्य खालावत जाते आणि या सर्व बाबींचा परिणाम त्यांच्या मानसिक आरोग्यावर होतो. सामान्यता चांगले जीवन जगण्यासाठी व्यक्तींचे मानसिक आरोग्य सदृढ असणे आवश्यक असते परंतु दैनिक जीवनामध्ये सोसाव्या लागणा—या विविध सामाजिक अवहेलनामुळे कुष्ठरोग्यांचे मानसिक खच्चिकरण होते आणि त्याचा परिणाम त्यांच्या मानसिक नैराश्यावर होतांना दिसून येतो. अशा स्थितीत कुष्ठरोगी व्यक्तींना समाजामध्ये जीवन जगत असतांना येणा—या विविध आर्थिक, सामाजिक आणि आरोग्य विषयक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर कोणता परिणाम होत आहे याचे अध्ययन प्रस्तुत संशोधनामध्ये करण्यात आलेले आहे.

**1.2 संशोधनाचे महत्व व गरज :**

कुष्ठरोगी व्यक्तींना आणि त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींना दैनिक जीवन जगत असतांना येणा—या विविध सामाजिक, आर्थिक आणि आरोग्य विषयक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. कुष्ठरोगी व्यक्तींच्या सामाजिक समस्यांच्या बाबतीत समाजातील लोकाकडून कुष्ठरोगी व्यक्ती व कुटुंबातील व्यक्तींना हिनतेची वागणूक देण्यात येते. विविध सामाजिक कार्यक्रमामध्ये त्यांना सहभागी करुण घेण्यास मज्जाव केला जातो. कुष्ठरोगी व्यक्तींच्या कुटुंबामध्ये काही कार्यक्रम आयोजित केल्यास त्यामध्ये समाजातील लोक सहभागी होत नाहीत. या सामाजिक समस्यांमुळे कुष्ठरोगी व्यक्तींना प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या आर्थिक समस्यांना देखिल सामोरे जावे लागते कारण सामाजिक समस्या हीच कुष्ठरोगी व्यक्तींच्या आर्थिक समस्येला मोठया प्रमाणात कारणीभुत असल्याचे दिसून येते कारण समाजातील लोक कुष्ठरोगी व्यक्तीशी असलेले व्यवहार समाप्त करतात आणि त्यामुळे त्यांचे उत्पन्न, रोजगार, व्यवसाय यावर विपरीत परिणाम होतो. या सामाजिक आणि आर्थिक समस्यांचा परिणाम कुष्ठरोगी व्यक्तींच्या आरोग्य विषयक समस्यांवर सुध्दा होतो समाजामध्ये कोणी आपणाशी बोलत नाही, कार्यक्रमामध्ये सहभागी होवु दिल्या जात नाही, करत असलेल्या व्यवसायामध्ये उत्पादीत वस्तु कोणी खरेदी करत नाही, रोजगारी करण्यास मज्जाव करण्यात येतो कामावरुन काढुन टाकण्यात येते. या सर्व सामाजिक आर्थिक बाबीमुळे कुष्ठरोगी व्यक्तींची मानसिक कुचंबना होते व त्यातुन विविध प्रकारच्या आरोग्य विषयक समस्या निर्माण होतात. या सामाजिक, आर्थिक आणि आरोग्य विषयक समस्यांच्या कुष्ठरोगी व्यक्तींच्या मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. वास्तविकता व्यक्तींचे मानसिक आरोग्य हे त्यांच्या अंतर्गत सदृढतेचे लक्षण मानल्या जाते व्यक्तीला कितीही प्रमाणात आरोग्य विषयक समस्या असतील तरी सुध्दा त्यांचे मानसिक आरोग्य जर सदृढ असेल तर ती व्यक्ती आजाराशी दोन हात करुन चांगले जीवन जगु शकते शिवाय आपले आयुष्य वाढवु शकते. परंतु कुष्ठरोगी व्यक्तींना सोसाव्या लागणा—या विविध सामाजिक आर्थिक आणि आरोग्य विषयक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होणे सहजवृत्ती आहे. कुष्ठरोगी व्यक्तीच्या संदर्भात विविध

समस्यांची सोडवणू करण्यासाठी शासन आणि अशासकीय संस्थांच्या माध्यमातुन मोठया प्रमाणात कार्य करण्यात येत आहे त्यासंदर्भात जाणीव जागृती करुन समाजाचा कुष्ठरोगी व्यक्तीकडे पाहण्याचा दृष्टीकोण बदलण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे अशा स्थितीत कुष्ठरोगी व्यक्तींना येणा–या विविध समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर कितपत परिणाम होतो आहे त्याचे प्रमाण कितपत कमी होण्यास मदत झाली याचा अभ्यास वर्तमान परिप्रेक्ष्यामध्ये करणे आवश्यक आहे जेणेकरुन कुष्ठरोगी व्यक्तींच्या समस्या सोडविण्यासाठी सद्यस्थितीमध्ये राबविण्यात येणा–या उपाययोजनामध्ये उचित बदल करणे शक्य होईल.

**1.3 संशोधनाची उदिद्ष्टये :**

1. कुष्ठरोगी व्यक्तींच्या सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे.
2. कुष्ठरोगी व्यक्तींच्या आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.
3. कुष्ठरोगी व्यक्तींच्या आरोग्य विषयक समस्यांचा अभ्यास करणे.
4. कुष्ठरोगी व्यक्तींच्या मानसिक आरोग्याचा अभ्यास करणे.
5. कुष्ठरोगी व्यक्तींच्या सामाजिक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावरील प्रभावाचा अभ्यास करणे.
6. कुष्ठरोगी व्यक्तींच्या आर्थिक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावरील प्रभावाचा अभ्यास करणे.
7. कुष्ठरोगी व्यक्तींच्या आरोग्य विषयक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावरील प्रभावाचा अभ्यास करणे.

**1.4 संशोधनाची गृहीतके :**

1. कुष्ठरोगी व्यक्तींना येणा–या उच्च, सामान्य आणि निम्न सामाजिक, आर्थिक, आरोग्य विषयक समस्यांमध्ये फरक असणार नाही म्हणजे सर्व कुष्ठरोग्यांच्या समस्या सारख्या आहेत.
2. कुष्ठरोगी व्यक्तींपैकी उच्च, सामान्य आणि निम्न मानसिक आरोग्य स्तरामध्ये सहभागी व्यक्तींचे प्रमाण सारखे आहे.
3. कुष्ठरोगी व्यक्तींच्या सामाजिक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर सकारात्मक प्रभाव पडतो.
4. कुष्ठरोगी व्यक्तींच्या आर्थिक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर सकारात्मक प्रभाव पडतो.
5. कुष्ठरोगी व्यक्तींच्या आरोग्य विषयक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर सकारात्मक प्रभाव पडतो.

**1.5 संशोधनाच्या मर्यादा व परिमर्यादा :**

प्रस्तुत संशोधन कार्य हे विदर्भातील अमरावती जिल्हयातील कुष्ठरोगी व्यक्तीच्या सामाजिक समस्या, आर्थिक समस्या, आरोग्य विषयक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावरील प्रभावापुरते मर्यादित आहे. या संशोधनामध्ये अमरावती जिल्हयातील कुष्ठरोगी व्यक्तीचाच समावेश करण्यात आला आहे.

**1.6 संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधनामध्ये सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये अमरावती जिल्हयातील कुष्ठरोगी व्यक्तींना येणा–या सामाजिक, आर्थिक आणि आरोग्य विषयक समस्या व अडचणी कोणकोणत्या आहेत तसेच त्यांना येणाऱ्या या सामाजिक, आर्थिक आणि आरोग्य विषयक समस्यांमुळे त्यांच्या मानसिकतेवर कोणते परिणाम होतात यासंदर्भातील आवश्यक तथ्यांचे संकलन सर्वेक्षणाच्या माध्यमातुन करण्यात आले आहे. अशा प्रकारे या संशोधनामध्ये प्रत्यक्षता कुष्ठरोगी व्यक्तीकडुन

त्यांना येणा—या सामाजिक, आर्थिक व आरोग्य विषयक अडचणी व समस्या व या समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम यासंदर्भात आवश्यक माहिती ही सर्वेक्षण पध्दतीच्या माध्यमातुन संकलीत करण्यात आली आहे.

**1.7 संशोधनाची जनसंख्या आणि नमुना निवड :**

प्रस्तुत संशोधनामध्ये अमरावती जिल्हयातील कुष्ठरोगी व्यक्ती प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या आहे. अमरावती जिल्हयामध्ये कार्यरत असलेले विदर्भ महारोगी सेवा मंडळ या संस्थेमध्ये नोदणीकृत असलेल्या कुष्ठरोगी व्यक्तींची यादी प्राप्त करण्यात आली. या यादीमध्ये कुष्ठरोगी व्यक्तींचे नाव, त्यांचा निवासाचा पत्ता आणि संपर्क क्रमांक या बाबी प्राप्त करण्यात आल्या. या कुष्ठरोगी व्यक्तींच्या यादीवरुन त्यांच्या संपर्क क्रमांकावर संपर्क प्रस्थापित करण्यात आला आणि ते सध्या राहत असलेल्या ठिकानाची माहिती त्यांच्याकडून प्राप्त करण्यात आली. अशा प्रकारे एकूण जनसंख्येमधुन संभाव्य नमुना निवड पध्दतीच्या माध्यमातुन 300 कुष्ठरोगी व्यक्तीची निवड या संशोधनासाठी करण्यात आली आहे.

**1.8 संशोधनाची साधने :**

प्रस्तुत संशोधनामध्ये कुष्ठरोगी व्यक्तीना येणा—या सामाजिक, आर्थिक आणि आरोग्य विषयक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावरील प्रभावाचा अभ्यास करण्यासाठी स्वनिर्मित मुलाखत अनुसूचिचा वापर करण्यात आला आहे. प्रस्तुत अनुसूचिच्या संदर्भात कुष्ठरोगी व्यक्तींना येणा—या सामाजिक, आर्थिक आणि आरोग्य विषयक समस्या व त्यांचे मानसिक आरोग्य या क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन घेण्यात आले आणि त्यांनी केलेल्या सुचनांचा अभ्यास करुन प्रस्तुत संशोधनासाठी अतिंम स्वरुपात मुलाखत अनुसूचि निश्चित करण्यात आली आहे. या मुलाखत अनुसूचिमध्ये दोन विभाग करण्यात आले प्रथम विभागामध्ये कुष्ठरोगी व्यक्तींना येणा—या सामाजिक, आर्थिक आणि आरोग्य विषयक समस्यांशी संबंधित विधानांची निश्चिती करण्यात आली तसेच विभाग व्दितीय मध्ये कुष्ठरोग्यांच्या मानसिक आरोग्याशी संबंधित विधाने निश्चित करण्यात आली आहेत. या संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या मुलाखत अनुसूचिची विश्वासनियता आणि वैधता घटक निहाय तपासण्यात आली आहे. त्यासाठी सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात आला. यावरुन या संशोधनामध्ये तथ्य संकलनासाठी वापरण्यात आलेली मुलाखत अनुसूची विश्वासनिय आणि वैध असल्याचे आढळून आले.

**1.9 तथ्य संकलन :**

प्रस्तुत संशोधनामध्ये कुष्ठरोगी व्यक्तीना येणा—या सामाजिक, आर्थिक आणि आरोग्य विषयक समस्यांच्या आणि या समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावरील प्रभावाच्या संदर्भात आवश्यक तथ्यांचे संकलन प्रत्यक्षता कुष्ठरोगी व्यक्तींकडून मुलाखत अनुसुचिच्या माध्यमातुन करण्यात आले आहे.

**1.10 तथ्य विश्लेषण :**


प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात कुष्ठरोगी व्यक्तींकडुन प्राप्त तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी वारंवारीता, शेकडेवारी पध्दती आणि काई स्क्वेअर या सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात आला आहे.

**सारणी क. 1.1**

**कुष्ठरोगी व्यक्तीना येणा—या उच्च, सामान्य आणि निम्न स्तरनिहाय सामाजिक समस्यांचे विवरण दर्शवणारी सारणी.**

| सामाजिक समस्यांचे विवरण | वारंवारीता / संख्या | शेकडा प्रमाण | अपेक्षित वारंवारीता | काई स्क्वेअरचे मूल्य |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| उच्च | 143 | 47.66% | 100 | 39.74 |
| सामान्य | 103 | 34.33% | 100 | |
| निम्न | 054 | 18.00% | 100 | |
| एकुण | 300 | 100.00% | | |





कुष्ठरोग्यांच्या सामाजिक समस्येचे स्तरनिहाय वितरण

वरिल सारणीमध्ये कुष्ठरोगी व्यक्तीच्या सामाजिक समस्यांचा अभ्यास करण्यात आला आहे त्यामध्ये उच्च, सामान्य व निम्न सामाजिक समस्या स्तरामध्ये सहभागी कुष्ठरोग्यांच्या प्रमाणामध्ये असलेल्या फरक काई स्क्वेअर या सांख्यिकीय तंत्राचा वापर करुण विश्लेषीत करण्यात आला. यासंदर्भात गणना प्राप्त काई स्क्वेअरचे मूल्य 39.74 आहे. प्राप्त काई स्क्वेअरचे मूल्य स्वाधिनता मात्रा 2 करिता 0.05 स्तरावर आवश्यक असलेल्या सारणी मूल्यापेक्षा अधिक आहे याचा अर्थ असा की, कुष्ठरोग्यांच्या सामाजिक समस्यांच्या स्तरनिहाय असलेल्या प्रमाणामध्ये फरक आढळून येतो. त्यामध्ये उच्च सामाजिक समस्या स्तरामध्ये सहभागी कुष्ठरोग्यांचे प्रमाण 47.66 आहे, सामान्य सामाजिक समस्या स्तरामध्ये सहभागी कुष्ठरोग्यांचे प्रमाण 34.33 तर निम्न सामाजिक समस्या स्तरामधील कुष्ठरोग्यांचे प्रमाण 18.00 आहे. यावरुन स्पष्ट होते की, सर्वाधिक कुष्ठरोगी व्यक्तींना येणा–या सामाजिक समस्यांचे प्रमाण सामान्य असुन सर्वात कमी कुष्ठरोगी व्यक्तींना निम्न प्रमाणात सामाजिक समस्या येतात.

**सारणी क. 1.2**

**कुष्ठरोगी व्यक्तीना येणा–या उच्च, सामान्य आणि निम्न स्तरनिहाय आर्थिक समस्यांचे विवरण दर्शवणारी सारणी.**

| आर्थिक समस्यांचे विवरण | वारंवारीता / संख्या | शेकडा प्रमाण | अपेक्षित वारंवारीता | काई स्क्वेअरचे मूल्य |
|---|---|---|---|---|
| उच्च | 129 | 43.00% | 100 | 22.74 |
| सामान्य | 108 | 36.00% | 100 | |
| निम्न | 063 | 21.00% | 100 | |
| एकुण | 300 | 100.00% | | |




कुष्ठरोग्यांच्या स्तरनिहाय आर्थिक समस्यांचे वितरण

वरिल सारणीमध्ये कुष्ठरोगी व्यक्तीच्या आर्थिक समस्यांचा अभ्यास करण्यात आला आहे त्यामध्ये उच्च, सामान्य व निम्न आर्थिक समस्या स्तरामध्ये सहभागी कुष्ठरोग्यांच्या प्रमाणामध्ये असलेल्या फरक काई स्क्वेअर या सांख्यिकीय तंत्राचा वापर करुण विश्लेषीत करण्यात आला. यासंदर्भात गणना प्राप्त काई स्क्वेअरचे मूल्य 22.74 आहे. प्राप्त काई स्क्वेअरचे मूल्य स्वाधिनता मात्रा 2 करिता 0.05 स्तरावर आवश्यक असलेल्या सारणी मूल्यापेक्षा अधिक आहे याचा अर्थ असा की, कुष्ठरोग्यांच्या आर्थिक समस्यांच्या स्तरनिहाय असलेल्या प्रमाणामध्ये फरक आढळून येतो. त्यामध्ये उच्च आर्थिक समस्या स्तरामध्ये सहभागी कुष्ठरोग्यांचे प्रमाण 43.00 आहे, सामान्य आर्थिक समस्या स्तरामध्ये सहभागी कुष्ठरोग्यांचे प्रमाण 36.00 तर निम्न आर्थिक समस्या स्तरामधील कुष्ठरोग्यांचे प्रमाण 21.00 आहे. यावरुन स्पष्ट होते की, सर्वाधिक कुष्ठरोगी व्यक्तींना येणा—या आर्थिक समस्यांचे प्रमाण उच्च असुन सर्वात कमी कुष्ठरोगी व्यक्तींना निम्न प्रमाणात आर्थिक समस्या येतात.

**सारणी क्र. 1.3**

**कुष्ठरोगी व्यक्तीना येणा—या उच्च, सामान्य आणि निम्न स्तरनिहाय आरोग्य विषयक समस्यांचे विवरण दर्शवणारी सारणी.**

| आरोग्य विषयक समस्यांचे विवरण | वारंवारीता / संख्या | शेकडा प्रमाण | अपेक्षित वारंवारीता | काई स्क्वेअरचे मूल्य |
|---|---|---|---|---|
| उच्च | 138 | 46.00% | 100 | 46.16 |
| सामान्य | 116 | 38.67% | 100 | |
| निम्न | 046 | 15.33% | 100 | |
| एकुण | 300 | 100.00% | | |



कुष्ठरोग्यांच्या आरोग्य विषयक समस्यांचे वितरण


वरिल सारणीमध्ये कुष्ठरोगी व्यक्तीच्या आरोग्य विषयक समस्यांचा अभ्यास करण्यात आला आहे त्यामध्ये उच्च, सामान्य व निम्न आरोग्य विषयक समस्या स्तरामध्ये सहभागी कुष्ठरोग्यांच्या प्रमाणामध्ये असलेल्या फरक काई स्क्वेअर या सांख्यिकीय

तंत्राचा वापर करुण विश्लेषीत करण्यात आला. यासंदर्भात गणना प्राप्त काई स्क्वेअरचे मूल्य 46.16 आहे. प्राप्त काई स्क्वेअरचे मूल्य स्वाधिनता मात्रा 2 करिता 0.05 स्तरावर आवश्यक असलेल्या सारणी मूल्यापेक्षा अधिक आहे याचा अर्थ असा की, कुष्ठरोग्यांच्या आरोग्य विषयक स्तरनिहाय असलेल्या प्रमाणामध्ये फरक आढळून येतो. त्यामध्ये उच्च आरोग्य विषयक समस्या स्तरामध्ये सहभागी कुष्ठरोग्यांचे प्रमाण 46.00 आहे, सामान्य आरोग्य विषयक समस्या स्तरामध्ये सहभागी कुष्ठरोग्यांचे प्रमाण 38.67 तर निम्न आरोग्य विषयक समस्या स्तरामधील कुष्ठरोग्यांचे प्रमाण 15.33 आहे. यावरुन स्पष्ट होते की, सर्वाधिक कुष्ठरोगी व्यक्तींना येणा—या आरोग्य विषयक समस्यांचे प्रमाण उच्च असुन सर्वात कमी कुष्ठरोगी व्यक्तींना निम्न प्रमाणात आरोग्य विषयक समस्या येतात.

**सारणी क. 1.4**

**कुष्ठरोगी व्यक्तीना येणा—या उच्च, सामान्य आणि निम्न स्तरनिहाय मानसिक आरोग्याचे विवरण दर्शवणारी सारणी.**

| मानसिक आरोग्य विवरण | वारंवारीता / संख्या | शेकडा प्रमाण | अपेक्षित वारंवारीता | काई स्क्वेअरचे मूल्य |
|---|---|---|---|---|
| उच्च | 065 | 21.67% | 100 | 34.62 |
| सामान्य | 089 | 29.67% | 100 | |
| निम्न | 146 | 48.66% | 100 | |
| एकुण | 300 | 100% | | |





वरिल सारणीमध्ये कुष्ठरोगी व्यक्तीच्या मानसिक आरोग्याचा अभ्यास करण्यात आला आहे त्यामध्ये उच्च, सामान्य व निम्न मानसिक आरोग्य स्तरामध्ये सहभागी कुष्ठरोग्यांच्या प्रमाणामध्ये असलेल्या फरक काई स्क्वेअर या सांख्यिकीय तंत्राचा वापर करुण विश्लेषीत करण्यात आला. यासंदर्भात गणना प्राप्त काई स्क्वेअरचे मूल्य 34.62 आहे. प्राप्त काई स्क्वेअरचे मूल्य स्वाधिनता मात्रा 2 करिता 0.05 स्तरावर आवश्यक असलेल्या सारणी मूल्यापेक्षा अधिक आहे याचा अर्थ असा की, कुष्ठरोग्यांच्या मानसिक आरोग्याच्या स्तरनिहाय असलेल्या प्रमाणामध्ये फरक आढळून येतो. त्यामध्ये उच्च मानसिक आरोग्य स्तरामध्ये सहभागी कुष्ठरोग्यांचे प्रमाण 21.67 आहे, सामान्य मानसिक आरोग्य स्तरामध्ये सहभागी कुष्ठरोग्यांचे प्रमाण 29.67 तर निम्न मानसिक आरोग्य स्तरामधील कुष्ठरोग्यांचे प्रमाण 48.66 आहे. यावरुन स्पष्ट होते की, सर्वाधिक कुष्ठरोगी व्यक्तींच्या मानसिक आरोग्याचे प्रमाण निम्न असुन सर्वात कमी कुष्ठरोगी व्यक्तीच्या मानसिक आरोग्याचे प्रमाण उच्च आहे.

**सारणी क. 1.5**

**कुष्ठरोगी व्यक्तीना येणा—या उच्च, सामान्य आणि निम्न स्तरनिहाय सामाजिक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावरील प्रभाव दर्शवणारी सारणी.**

| स्वतंत्र चल | प्रसरण स्त्रोत | वर्गाची बेरीज | स्वाधिनता मात्रा | मध्यमान वर्ग | प्रसरण अनुपात | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|---|
| सामाजीक समस्या | समुहाच्या मध्ये | 1638.653 | 2 | 819.326 | 16.160 | सार्थक नाही |
| | समुहाच्या अंतर्गत | 15058.040 | 297 | 50.700 | | |
| | एकूण | 16696.693 | 299 | | | |




कुष्ठरोग्यांच्या सामाजिक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावरील प्रभाव

वरील सारणीमध्ये कुष्ठरोगी व्यक्तींना येणा—या सामाजिक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावरील प्रभावाचे विश्लेषण करण्यात आले आहे. त्यामध्ये समुहाच्या मध्ये वर्गाची बेरीज 1638.653 आहे. तसेच स्वाधिनता मात्रा 2 आणि मध्यमान वर्ग 819. 326 आहे. समुहाच्या अंतर्गत वर्गाची बेरीज 15058.040 आहे तर स्वाधिनता मात्रा 297 आणि मध्यमान वर्ग 50.700 आहे. गणना प्राप्त प्रसरण अनुपात मूल्य 16.160 आहे. प्राप्त प्रसरण अनुपात मूल्य 0.05 स्तरावर अपेक्षीत असलेल्या सारणी मूल्यापेक्षा जास्त असल्याचे दिसून येते. याचा अर्थ असा की, कुष्ठरोगी व्यक्तींना येणा—या सामाजिक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर धनात्मक प्रभाव पडत असल्याचे दिसून येते. यामध्ये उच्च सामाजिक समस्या स्तरामध्ये सहभागी असलेल्या कुष्ठरोगी व्यक्तींच्या मानसिक आरोग्याचे मध्यमान 39.757 आहे तसेच सामान्य सामाजिक समस्या स्तरामधील कुष्ठरोग्यांच्या मानसिक आरोग्याचे मध्यमान 65.984 आहे आणि निम्न सामाजीक समस्या स्तरामधील कुष्ठरोग्यांच्या मानसिक आरोग्याचे मध्यमान 89.129 आहे. यावरुन दिसून येते की, उच्च सामाजिक समस्या असणा—या कुष्ठरोग्यांचे मानसिक आरोग्य निम्न असुन निम्न सामाजिक समस्या असणा—या कुष्ठरोग्यांचे मानसिक आरोग्य उच्च प्रतिचे आहे.

**सारणी क्र. 1.6**

**कुष्ठरोगी व्यक्तीना येणा—या उच्च, सामान्य आणि निम्न स्तरनिहाय आर्थिक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावरील प्रभाव दर्शवणारी सारणी.**

| स्वतत्र चल | प्रसरण स्त्रोत | वर्गाची बेरीज | स्वाधिनता मात्रा | मध्यमान वर्ग | प्रसरण अनुपात | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|---|
| आर्थिक समस्या | समुहाच्या मध्ये | 1436.651 | 2 | 718.325 | 14.36 | सार्थक नाही |
| | समुहाच्या अंतर्गत | 14856.040 | 297 | 50.020 | | |
| | एकूण | 16292.691 | 299 | | | |




कुष्ठरोग्यांच्या आर्थिक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावरील प्रभाव

वरील सारणीमध्ये कुष्ठरोगी व्यक्तींना येणा—या आर्थिक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावरील प्रभावाचे विश्लेषण करण्यात आले आहे. त्यामध्ये समुहाच्या मध्ये वर्गाची बेरीज 1436.651 आहे. तसेच स्वाधिनता मात्रा 2 आणि मध्यमान वर्ग 718. 325 आहे. समुहाच्या अंतर्गत वर्गाची बेरीज 14856.040 आहे तर स्वाधिनता मात्रा 297 आणि मध्यमान वर्ग 50.020 आहे. गणना प्राप्त प्रसरण अनुपात मूल्य 14.36 आहे. प्राप्त प्रसरण अनुपात मूल्य 0.05 स्तरावर अपेक्षीत असलेल्या सारणी मूल्यापेक्षा जास्त असल्याचे दिसून येते. याचा अर्थ असा की, कुष्ठरोगी व्यक्तींना येणा—या आर्थिक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर धनात्मक प्रभाव पडत असल्याचे दिसून येते. यामध्ये उच्च आर्थिक समस्या स्तरामध्ये सहभागी असलेल्या कुष्ठरोगी व्यक्तींच्या मानसिक आरोग्याचे मध्यमान 34.716 आहे तसेच सामान्य आर्थिक समस्या स्तरामधील कुष्ठरोग्यांच्या मानसिक आरोग्याचे मध्यमान 58.914 आहे आणि निम्न आर्थिक समस्या स्तरामधील कुष्ठरोग्यांच्या मानसिक आरोग्याचे मध्यमान 93.183 आहे. यावरुन दिसून येते की, उच्च आर्थिक समस्या असणा—या कुष्ठरोग्यांचे मानसिक आरोग्य निम्न असुन निम्न आर्थिक समस्या असणा—या कुष्ठरोग्यांचे मानसिक आरोग्य उच्च प्रतिचे आहे.

**सारणी क. 1.7**

**कुष्ठरोगी व्यक्तीना येणा—या उच्च, सामान्य आणि निम्न स्तरनिहाय आरोग्य विषयक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावरील प्रभाव दर्शवणारी सारणी.**

| स्वतत्र चल | प्रसरण स्त्रोत | वर्गाची बेरीज | स्वाधिनता मात्रा | मध्यमान वर्ग | प्रसरण अनुपात | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|---|
| आरोग्य विषयक समस्या | समुहाच्या मध्ये | 2042.657 | 2 | 1021.328 | 19.616 | सार्थक नाही |
| | समुहाच्या अंतर्गत | 15463.044 | 297 | 52.064 | | |
| | एकूण | 17505.701 | 299 | | | |




कुष्ठरोग्यांच्या आरोग्य विषयक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावरील ।


वरील सारणीमध्ये कुष्ठरोगी व्यक्तींना येणा–या आरोग्य विषयक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावरील प्रभावाचे विश्लेषण करण्यात आले आहे. त्यामध्ये समुहाच्या मध्ये वर्गाची बेरीज 2042.657 आहे. तसेच स्वाधिनता मात्रा 2 आणि मध्यमान वर्ग 1021.328 आहे. समुहाच्या अंतर्गत वर्गाची बेरीज 15463.044 आहे तर स्वाधिनता मात्रा 297 आणि मध्यमान वर्ग 52.064 आहे. गणना प्राप्त प्रसरण अनुपात मूल्य 19.616 आहे. प्राप्त प्रसरण अनुपात मूल्य 0.05 स्तरावर अपेक्षीत असलेल्या सारणी मूल्यापेक्षा जास्त असल्याचे दिसून येते. याचा अर्थ असा की, कुष्ठरोगी व्यक्तींना येणा–या आरोग्य विषयक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर धनात्मक प्रभाव पडत असल्याचे दिसून येते. यामध्ये उच्च आरोग्य विषयक समस्या स्तरामध्ये सहभागी असलेल्या कुष्ठरोगी व्यक्तींच्या मानसिक आरोग्याचे मध्यमान 48.743 आहे तसेच सामान्य आरोग्य विषयक समस्या स्तरामधील कुष्ठरोग्यांच्या मानसिक आरोग्याचे मध्यमान 57.992 आहे आणि निम्न आर्थिक समस्या स्तरामधील कुष्ठरोग्यांच्या मानसिक आरोग्याचे मध्यमान 96.050 आहे. यावरुन दिसून येते की, उच्च आरोग्य विषयक समस्या असणा–या कुष्ठरोग्यांचे मानसिक आरोग्य निम्न असुन निम्न आरोग्य विषयक समस्या असणा–या कुष्ठरोग्यांचे मानसिक आरोग्य उच्च प्रतिचे आहे.

**सारणी क. 1.8**

**कुष्ठरोगी व्यक्तीना येणा–या उच्च, सामान्य आणि निम्न स्तरनिहाय सामाजीक, आर्थिक आणि आरोग्य विषयक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावरील प्रभावाचे मध्यमान दर्शवणारी सारणी.**

| | सामाजीक,आर्थिक व आरोग्य विषयक समस्या निहाय मानसिक आरोग्याचे मध्यमान | | |
|---|---|---|---|
| कुष्ठरोग्यांच्या समस्यांचे स्तर | सामाजीक समस्या | आर्थिक समस्या | आरोग्य विषयक समस्या |
| उच्च समस्या व मानसिक आरोग्य मध्यमान | 39.757 | 34.716 | 48.743 |

| | | | |
|---|---|---|---|
| सामान्य समस्या व मानसिक आरोग्य मध्यमान | 65.984 | 58.914 | 57.992 |
| निम्न समस्या व मानसिक आरोग्य मध्यमान | 89.129 | 93.183 | 96.050 |




कुष्ठरोग्यांच्या स्तरनिहाय समस्या आणि मानसिक आरोग्याचे ।

वरील सारणी मध्ये कुष्ठरोग्यांच्या सामाजिक आर्थिक आणि आरोग्य विषयक समस्यांच्या उच्च, सामान्य आणि निम्न स्तरनिहाय असलेल्या मानसिक आरोग्याचे मध्यमान दर्शवण्यात आले आहे. त्यामध्ये उच्च सामाजिक समस्या असणा–या कुष्ठरोग्यांच्या मानसिक आरोग्यांचे प्रमाण 39.757, उच्च आर्थिक समस्या असणा–या कुष्ठरोग्यांच्या मानसिक आरोग्याचे मध्यमान 34.716 व उच्च आरोग्य विषयक समस्या असणा–या कुष्ठरोग्यांच्या मानसिक आरोग्याचे मध्यमान 48.743 आहे. यावरुन स्पष्ट होते की, उच्च सामाजिक आणि आर्थिक समस्यांच्या तुलनेत उच्च आरोग्य विषयक समस्या असलेल्या कुष्ठरोग्यांच्या मानसिक आरोग्याचे प्रमाण सर्वाधिक आहे.

सामान्य सामाजिक समस्या असणा–या कुष्ठरोग्यांच्या मानसिक आरोग्यांचे प्रमाण 65.984, सामान्य आर्थिक समस्या असणा–या कुष्ठरोग्यांच्या मानसिक आरोग्याचे मध्यमान 58.914 व सामान्य आरोग्य विषयक समस्या असणा–या कुष्ठरोग्यांच्या मानसिक आरोग्याचे मध्यमान 57.992 आहे. यावरुन स्पष्ट होते की, सामान्य आर्थिक व आरोग्य विषयक समस्यांच्या तुलनेत सामान्य सामाजीक समस्या असलेल्या कुष्ठरोग्यांच्या मानसिक आरोग्याचे प्रमाण सर्वाधिक आहे.

निम्न सामाजिक समस्या असणा–या कुष्ठरोग्यांच्या मानसिक आरोग्यांचे प्रमाण 89.129, निम्न आर्थिक समस्या असणा–या कुष्ठरोग्यांच्या मानसिक आरोग्याचे मध्यमान 93.183 व निम्न आरोग्य विषयक समस्या असणा–या कुष्ठरोग्यांच्या मानसिक आरोग्याचे मध्यमान 96.050 आहे. यावरुन स्पष्ट होते की, निम्न सामाजिक व आर्थिक समस्यांच्या तुलनेत सामान्य आरोग्य विषयक समस्या असलेल्या कुष्ठरोग्यांच्या मानसिक आरोग्याचे प्रमाण सर्वाधिक आहे.

**1.11 संशोधनाचे निष्कर्ष :**

1. कुष्ठरोगी व्यक्तींना येणा–या उच्च, सामान्य आणि निम्न स्तरनिहाय सामाजिक समस्यांमध्ये फरक आहे. त्यामध्ये सर्वाधिक कुष्ठरोग्यांना उच्च सामाजिक समस्यांना तोंड द्यावे लागते तर सर्वात कमी कुष्ठरोग्यांना निम्न प्रतिच्या सामाजिक समस्यां सोसाव्या लागतात.
2. कुष्ठरोगी व्यक्तींना येणा–या उच्च, सामान्य आणि निम्न स्तरनिहाय आर्थिक समस्यांमध्ये फरक आहे. त्यामध्ये सर्वाधिक कुष्ठरोगी व्यक्तींना उच्च आर्थिक समस्यांना भेडसावतात तर सर्वात कमी कुष्ठरोगी व्यक्तींना निम्न प्रमाणात आर्थिक समस्या भेडसावत असल्याचे दिसून येते.

3. कुष्ठरोगी व्यक्तींना येणा—या उच्च, सामान्य आणि निम्न स्तरनिहाय आरोग्य विषयक समस्यांमध्ये फरक आहे. त्यामध्ये सर्वाधिक कुष्ठरोगी व्यक्तींना उच्च प्रतिच्या आरोग्य विषयक समस्या सोसाव्या लागतात तर सर्वात कमी कुष्ठरोगी व्यक्तींना निम्न प्रमाणात आरोग्य विषयक समस्या सहन कराव्या लागतात.
4. कुष्ठरोगी व्यक्तींच्या उच्च, सामान्य आणि निम्न स्तरनिहाय मानसिक आरोग्यामध्ये फरक आहे. त्यामध्ये सर्वाधिक कुष्ठरोगी व्यक्तींचे मानसिक आरोग्य निम्न प्रतिचे आहे तर सर्वात कमी कुष्ठरोगी व्यक्तींचे मानसिक आरोग्य उच्च प्रतीचे असल्याचे स्पष्ट होते.
5. कुष्ठरोगी व्यक्तींच्या उच्च, सामान्य आणि निम्न स्तरनिहाय असलेल्या सामाजिक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर प्रभाव पडतो त्यामध्ये ज्या कुष्ठरोगी व्यक्तींच्या सामाजीक समस्या उच्च आहेत त्यांचे मानसिक आरोग्य निम्न प्रतिचे आहे तर ज्या कुष्ठरोगी व्यक्तींच्या सामाजिक समस्या निम्न आहेत त्यांचे मानसिक आरोग्य उच्च प्रतिचे असल्याचे स्पष्ट होते.
6. कुष्ठरोगी व्यक्तींच्या उच्च, सामान्य आणि निम्न स्तरनिहाय असलेल्या आर्थिक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर प्रभाव पडतो त्यामध्ये ज्या कुष्ठरोगी व्यक्तींच्या आर्थिक समस्या उच्च आहेत त्यांचे मानसिक आरोग्य निम्न प्रतिचे आहे तर ज्या कुष्ठरोगी व्यक्तींच्या आर्थिक समस्या निम्न आहेत त्यांचे मानसिक आरोग्य उच्च प्रतिचे असल्याचे स्पष्ट होते.
7. कुष्ठरोगी व्यक्तींच्या उच्च, सामान्य आणि निम्न स्तरनिहाय असलेल्या आरोग्य विषयक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर प्रभाव पडतो त्यामध्ये ज्या कुष्ठरोगी व्यक्तींच्या आरोग्य विषयक समस्या उच्च आहेत त्यांचे मानसिक आरोग्य निम्न प्रतिचे आहे तर ज्या कुष्ठरोगी व्यक्तींच्या आरोग्य विषयक समस्या निम्न आहेत त्यांचे मानसिक आरोग्य उच्च प्रतिचे असल्याचे स्पष्ट होते.
8. कुष्ठरोगी व्यक्तींना येणा—या विविध समस्यां आणि त्यांच्या मानसिक आरोग्याच्या मध्यमानाची तुलनेवरुन स्पष्ट होते की, उच्च आरोग्य विषयक समस्या असणा—या कुष्ठरोग्यांचे मानसिक आरोग्य उच्च आर्थिक व सामाजिक समस्या असणा—या कुष्ठरोग्यांच्या तुलनेत अधिक प्रभावी आहे तर उच्च आर्थिक समस्या असणा—या कुष्ठरोग्यांच्या मानसिक आरोग्याचे प्रमाण सर्वात कमी आहे.
9. सामान्य सामाजिक समस्या असणा—या कुष्ठरोग्यांचे मानसिक आरोग्य सामान्य आर्थिक व आरोग्य विषयक समस्या असणा—या कुष्ठरोग्यांच्या तुलनेत अधिक प्रभावी आहे तर सामान्य आरोग्य विषयक समस्या असणा—या कुष्ठरोग्यांच्या मानसिक आरोग्याचे प्रमाण सर्वात कमी आहे.
10. निम्न आरोग्य विषयक समस्या असणा—या कुष्ठरोग्यांचे मानसिक आरोग्य निम्न सामाजिक व आर्थिक समस्या असणा—या कुष्ठरोग्यांच्या तुलनेत अधिक प्रभावी आहे तर निम्न सामाजिक समस्या असणा—या कुष्ठरोग्यांच्या मानसिक आरोग्याचे प्रमाण सर्वात कमी आहे.

### 1.11 शिफारशी व उपयोजन :

प्रस्तुत संशोधनामध्ये कुष्ठरोगी व्यक्तीच्या सामाजिक, आर्थिक आणि आरोग्य विषयक समस्यांचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर सार्थक प्रभाव पडत असल्याचे दिसून आले. ज्या कुष्ठरोगी व्यक्तींना सामाजिक आर्थिक आणि आरोग्य विषयक समस्या कमी प्रमाणात आहेत अथवा निम्न आहेत अशा कुष्ठरोग्यांचे मानसिक आरोग्य सर्वाधिक प्रभावी आढळून आले तर ज्या कुष्ठरोग्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि आरोग्य विषयक समस्या उच्च प्रतिच्या आहेत म्हणजे मोठया प्रमाणात आहेत अशा कुष्ठरोग्यांचे मानसिक आरोग्य निम्न प्रतिचे असल्याचे स्पष्ट होते. अशा स्थितीत कुष्ठरोगी व्यक्तीच्या सामाजिक आर्थिक आणि आरोग्य विषयक समस्यांची सोडवणूक केल्यास त्यांच्या मानसिक आरोग्याच्या विकासासाठी पोषक वातावरण निर्माण होईल आणि आजाराच्या विरुध्द एक प्रभावी जीवन जगण्याचा आत्मविश्वास त्यांच्यामध्ये निर्माण होण्यास मदत होईल त्यासाठी शासकीय आणि अशासकीय संस्थांच्या माध्यमातुन सक्रिय प्रयत्न होणे आवश्यक आहे. याशिवाय महाविद्यालयीन विविध

कार्यक्रमांच्या माध्यमातुन कुष्ठरोगी व्यक्तींच्या सामाजिक, आर्थिक आणि आरोग्य विषयक समस्या दुर करण्यासाठी आणि त्यांचे मानसिक आरोग्य प्रभावी करण्यासाठी जनजागृती करण्यात यावी त्यामध्ये समाजातील विविध घटकांचा सुध्दा सहभाग घेण्यात यावा शिवाय समाजामध्ये जो विरोधी विचारप्रवाह या कुष्ठरोगी व्यक्तीच्या बाबतीत निर्माण झालेला आहे तो दूर करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत त्यामुळे कुष्ठरोग्यांच्या समाजिक आर्थिक आणि आरोग्य विषयक समस्या दूर होतील परिणामता त्यांच्या मानसिक आरोग्याच्या स्तरामध्ये सुधारणा होवून भावी आयुष्य जगण्याचा सकारात्मक विचारप्रवाह त्यांच्यामध्ये विकसित होण्यास मदत होईल.

**संदर्भ ग्रंथ सूचि** :


- आगलावे, प्रदिप. 1998. समाजशास्त्रीय संकल्पना. प्रथम आवृत्ती नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन.
- जगताप ह. ना. 2006 शैक्षणिक मानसषास्त्र, पुणे : नुतन प्रकाषन.
- श्रीवास्तव जी. एन. 2010. सामाजिक मानसशास्त्र आगरा : अग्रवाल पब्लिकेशन.
- आपटे, वा. गो. 1990. मराठी शब्दावली. पुणे : सरस्वती ग्रंथ भंडार.
- कारंजकर, भि. दे. 1978. अमरावती शहराचा इतिहास. अमरावती.
- कुळकर्णी, श्रीनिवास 1994. स्वयंसेवी संस्था चळवळ–एक दृष्टीक्षेप. सामाजिक चळवळी : काल, आज व उद्या. लातुर : प्रबोधन प्रकाशन.
- कासट, गोविंद, गवई सुभाष. 1994. आठवणी दाजीसाहेबांच्या. अमरावती : गोविंद कासट सतिधाम मार्केट प्रकाशन.
- बेस्ट जॉन, डब्ल्यू. व खान जे. व्हि. 2011. रिसर्च इन एज्यूकेशन. दिल्ली : पीएचआय पब्लिकेशन.
- धर्मेन्द्र. 1977. सम फॅक्टस अबाउट लेप्रसी. न्यू दिल्ली : हिंन्द कुष्ठ निवारन संघ. इंडियन लेप्रसी असोशियन.
- दिगंबर. 2001. स्टॅटयास्टीक मेथर्ड. लुधियाना : कल्याणी पब्लिकेशन.
- कवळकर, एस. जे. 2001. लेप्रसी फॉर मेडिकल प्रॅक्टीसर्नस एण्ड पॅरामेडिकल वर्कर्स. स्विझरलॅड : सिबा गिगा लिमिटेड.
- सिंग, एस., बॅनर्जी, जयस्वाल. 2009. पार्टीसिपेशन लेव्हल ऑफ द लेप्रसी पेशंट इन सोसायटी. दिल्ली : इंडियन जर्नल्स फॉर लेप्रसी.